ढगं दाटुनी येतात चित्रपट ः आईशप्पथ

गायिका ः साधना सरगम गीतः सौमित्र संगीत ः अशोक पत्की

ढग दाटुनी येतात मन वाहुनी नेतात

ढग दाटुनी येतात मन वाहुनी नेतात

ऋतु पावसाळी सोळा थेंब होऊनी गातात

झिम्मड पाण्याची अल्लड गाण्याची

सर येते माझ्यात

माती लेवूनी या गंध होत जाते धुंद धुंद

तीच्या अंतरात खोल अंकुरतो एक बंध बंध

मुळे हरखुनी जातात झाडे पाऊस होतात

ऋतु पावसाळी सोळा थेंब होऊनी गातात

झिम्मड पाण्याची अल्लड गाण्याची २

सर येते माझ्यात

सुंबरान गाऊया रे सुंबरान गाऊया रे

हिलरी हिलरी आम्ही तुम्ही सुंबरान गाऊया रे

जीव होतो ओला चिंब

घेतो पाखराचे पंख

साऱ्या आभाळाला एक ओलसर रंग रंग रंग

शब्द भिजूनी जातात अर्थ थेंबांना येतात

ऋतु पावसाळी सोळा थेंब होऊनी गातात

झिम्मड पाण्याची अल्लड गाण्याची २

सर येते माझ्यात